आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

६ जुलै २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आषाढी एकादशीनिमीत्त राज्यात भक्तिमय वातावरण
- पंढरपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न / पांडुरंगानं राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गानं चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्यासाठी आशीर्वाद द्यावा असं मुख्यमंत्र्यांचं पांडुरंगाचरणी साकडं
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिनाचा यशस्वी दौरा संपवून ब्राझीलला पोहोचले, १७व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होणार
- अमेरिकेत टेक्सास राज्यात आलेल्या भीषण पुरामुळे आतापर्यंत किमान ४९ लोकांचा मृत्यू

  **आणि**
- भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताला विजयासह मालिकेत बरोबरी साधण्याची संधी

**<><><><>**

पांडुरंगाने राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्यासाठी आशीर्वाद द्यावा, असं साकडं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठलाला घातलं. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आज पहाटे मानाच्या वारकरी दांपत्यासह फडणवीस यांनी सपत्निक, विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीनं मुख्यमंत्र्यांचा सत्कार केला. पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि इतर यावेळी उपस्थित होते. वारीची परंपरा सतत वाढत असून या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी असल्याची बाब मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केली. वारीनं खऱ्या अर्थानं भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. सर्व विठ्ठलभक्तांनी वारीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा, असं आवाहन त्यांनी केलं.

**- होल्ड बाईट - मुख्यमंत्री -**

शासकीय महापूजेच्या मानाच्या वारकरी दांपत्याचा सन्मान, तसंच पायी स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कारानं सन्मानही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी झाला.

**<><><><>**

आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरात विविध विठ्ठल मंदिरांमध्ये भक्तांचा महासागर लोटला आहे. सर्वत्र जय हरी विठ्ठल आणि पांडुरंग हरीचा जयघोष आणि टाळ-मृदंगाच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमून गेल्याचं वातावरण आहे.

मुंबईतील वडाळ्याच्या प्रती पंढरपूर असलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक विठुरायाची पूजा केली. यावेळी शिंदे यांनी मंदिराच्या विकास आणि सुशोभीकरणासाठी मंजूर केलेल्या २५ कोटी रुपयांच्या कामांना लवकरच सुरुवात होईल, असं सांगितलं.

पुणे जिल्ह्यात जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या देहू येथील मुख्य मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

तर रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात, प्रती पंढरपूर समजल्या जाणाऱ्या आळंदी येथील ५० फूट उंचीच्या श्री विठ्ठल मूर्तीची सुंदर फुलांनी सजावट करण्यात आली.

रत्नागिरी शहरात मारुती मंदिरापासून विठ्ठल मंदिरापर्यंत सकाळी वारी काढण्यात आली; यात वारकऱ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात अभंग म्हणत रिंगण आणि फुगड्यांचा आनंद घेतला.

याचबरोबर, अहमदनगर शहरासह जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळा व खाजगी शाळांनी माऊलींच्या दिंड्या-पालख्यांचे आयोजन केले होते, ज्यामुळे शहराचे रस्ते विठू नामाच्या गजरात माऊलीमय झाले होते; यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत उत्साहाने सहभाग घेतला.

बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराजांच्या समाधीस्थळाच्या दर्शनासाठीही भक्तांची मोठी गर्दी दिसून आली.

जालना येथे आषाढी एकादशीनिमित्त श्री आनंदी स्वामींची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

विदर्भाचे पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथील स्वयंभू श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान येथे सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती, ही यात्रा चार दिवस सुरू राहणार आहे.

तसंच, हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव, जे संतश्रेष्ठ श्री नामदेव महाराजांचे जन्मस्थान आणि प्रती पंढरपूर म्हणून ओळखले जाते, तिथेही भाविकांनी संत नामदेवांच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना आषाढी एकादशीनिमित्त शुभेच्छा दिल्या. विठूमाऊली आपल्या समाजाला आनंदाची आणि समृद्धीची वाट दाखवेल, अशी भावना त्यांनी समजामाध्यमावरच्या पोस्टद्वारे व्यक्त केली.

<><><><>

अशूरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागात पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसैन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्य आणि न्यायासाठी करबाला इथं दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून हा दिवस पाळला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या निमित्तानं या बलिदानाचं स्मरण करून, यातून लोकांना बिकट परिस्थितीत सत्याच्या बाजूनं उभं राहण्याची प्रेरणा मिळत असल्याचं प्रतिपादन त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे केलं आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिनाचा यशस्वी दौरा संपवून आज ब्राझीलची राजधानी रिओ दी जानेरो इथं पोहोचले. भारताच्या प्रधानमंत्र्यांनी अर्जेंटिलाना भेट द्यायची ५७ वर्षांतली ही पहिली वेळ आहे. या भेटीची सुरुवात मोदी यांनी अर्जेंटिनाचे राष्ट्रपिता आणि स्वातंत्र्यसैनिक जनरल जोसे डी सॅन मार्टिन यांच्या स्मारकाला आदरांजली वाहून केली. त्यानंतर त्यांनी राष्ट्राध्यक्ष जेवियर मिलेई यांच्याशी बैठक घेतली. व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण, अंतराळ, आरोग्य आणि औषधनिर्मिती यासह द्विपक्षीय सहकार्याच्या विविध मुद्द्यांवर भर दिला. अर्जेंटिनाच्या दौऱ्यानंतर प्रधानमंत्री मोदी ब्राझील इथं १७व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. यादरम्यान ते जागतिक शांतता आणि सुरक्षा, प्रशासन सुधारणा, कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर, हवामान कृती, जागतिक आरोग्य,

आर्थिक बाबी यासह इतर अनेक महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवर विचारविनिमय करणार आहेत. तसंच अनेक द्विपक्षीय बैठकाही ते घेतील. ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्याशीही प्रधानमंत्री द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

<><><>

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी काल रिओ दी जानेरो इथं ब्रिक्स देशांच्या अर्थमंत्र्यांशी बैठका घेऊन धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट करण्यासाठी विविध क्षेत्रातला सहयोग वाढवण्यासह द्विपक्षीय सहकार्याच्या इतर मुद्द्यावर चर्चा केली. ब्रिक्स देशांचे अर्थमंत्री आणि केंद्रीय बँकांच्या गव्हर्नर्सच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, सीतारमण यांनी रशियाचे अर्थमंत्री अँटॉन सिलुआनोव्ह यांच्याशी आर्थिक क्षेत्रातल्या द्विपक्षीय सहकार्याबद्दल, तसंच न्यू डेव्हलपमेंट बँक या विषयावर संवाद साधला.

<><><>

अमेरिकेत टेक्सास राज्यात आलेल्या भीषण पुरामुळे आतापर्यंत किमान ४९ लोकांचा मृत्यू झाला असल्याचं वृत्त आहे. मृतांमध्ये १५ लहान मुलांचा समावेश असून, एका खाजगी युवा शिबिरातून २७ मुलं बेपत्ता असल्याची माहिती तिथल्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. पुराच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ८५० लोकांना वाचवण्यात यश आलं असल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

दरम्यान, या भागात आणखी पाऊस पडून पुन्हा पूर येण्याची शक्यता तिथल्या हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

दरम्यान, नरेंद्र मोदी यांनी या भीषण पुरामुळे झालेल्या जीवितहानीबद्दल, विशेषतः लहान मुलांच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. अमेरिकेचं सरकार आणि दु:खग्रस्त कुटुंबियांसोबत आपल्या संवेदना असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><>

गेल्या काही दिवसातल्या समाधानकारक पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यात ९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. यंदा जिल्ह्यात ३ लाख ९७ हेक्टरवर सोयाबीन पेरणी झाली

असून, तर १ लाख १६ हजार १३३ हेक्टरवर कपाशीची लागवड केली गेली आहे. त्याचबरोबर १३ हजार ९३८ हेक्टरवर उडदाची पेरणी झाली आहे.

**<><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथल्या नाथसागर जलाशयाचा साठा आता पन्नास टक्क्यांवर पोहोचला आहे. जलाशयात सध्या १६ हजार २९५ क्यूसेक -घनफुट प्रत सकंद वेगानं पाणी दाखल होत असल्यानं पाणी पातळीत झपाट्यानं वाढ होत असल्याचं प्रशासनानं कळवलं आहे.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष, आणि केंद्रीय सहकार मंत्रालयाचा स्थापना दिन हे औचित्य साधत सोलापूरात आज सहकार रॅली झाली. सहकार क्षेत्राची चळवळ ही सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्राचा कणा आहे. जिल्हा सहकारी बँकेचे पदाधिकारी, अधिकारी कर्मचारी सर्वांनीच आपले काम म्हणजे पांडुरंग आणि सहकार दिन हीच पंढरी असे समजून सहकाराची चळवळ मजबूत करावी असं आवाहन जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी यावेळी केले.

**<><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यावर भारतानं मजबूत पकड घेतली आहे. काल सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं विजयासाठी दिलेल्या ६०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, दुसऱ्या डावात इंग्लंडच्या ३ बाद ७२ धावा झाल्या होत्या.

आज सामन्याचा शेवटचा दिवस असून, या सामन्यात विजय मिळवून मालिकेत बरोबरी साधण्याची मोठी संधी भारताकडे आहे.

**//<><><><>//**